महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

दुरध्वनी क्र. : २६४७ ४२११ विस्तारित ३६४२ दूरभाष क्र. : ०२२-२६५८ १५१६.
२रा माळा, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई-मेल : promahagenco@gmail.com / aphale.mahesh@gmail.com

**संदर्भ :** मा.सं./जनसंपर्क/वृत्तपत्र टिप्पणी/

## वृत्तपत्र टिप्पणी

**मुंबई (दि. ०७/०९/२०१३) :**

नियामक आयोगाचे प्रकरण क्र. ९५/२०१३ दि. ०५/०९/२०१३ रोजी माननीय वीज नियामक आयोगाने महावितरण कंपनीला आदेश दिला आहे. परंतु, सदर आदेशाबाबत वृत्तांकन करताना काही प्रसार माध्यमातून / सदर आदेशाचे विश्लेषण करताना महानिर्मितीसंबंधी चुकीचा व विपर्यस्त मजकूर प्रसिध्द झालेला दिसतो. या पार्श्वभूमीवर प्रत्यक्ष वस्तुस्थिती दर्शविणारा खुलासा महानिर्मिती पुढीलप्रमाणे देत आहे.

नियामक आयोगाच्या वरील आदेशानुसार आयोगाने महानिर्मितीच्या खापरखेडा संच क्र. ५ व भुसावळ संच क्र. ४ च्या स्थिर आकाराची वसुली महावितरणतर्फे करण्याचे आदेश दिले आहेत.

खापरखेडा संच क्र. ५ वाणिज्यीक तत्वावर दि. १६/०४/२०१२ पासून व भुसावळ संच क्र. ४ हा दि. १६/११/२०१२ पासून कार्यरत असून त्याद्वारे महानिर्मिती सातत्याने चांगली वीजनिर्मिती करीत आहे. त्यासाठीचा स्थिर आकार महानिर्मितीकरिता पूर्वीपासून मंजूर करण्यात आला होता. परंतु, त्याची वीज ग्राहकांकडून वसुली करण्याचे तत्व वीज नियामक आयोगाने वरील आदेशानुसार आता निर्धारित केले आहे. ग्राहकांकडून वसूल होणारा हा स्थिर आकार आयोगाच्या निकषांनुसार मंजूर झालेल्या प्रकल्प भांडवली खर्चानुसारच असून त्याचा प्रकल्पखर्च वाढीशी काहीही संबंध नाही.

यादरम्यानच्या काळात वरील संचांच्या स्थिर आकारापोटी आवश्यक खर्च महानिर्मितीने स्वतः केला असून त्याची प्रत्यक्ष वसुली होत नसल्याने हा स्थिर आकार मिळण्यापासून महानिर्मिती वंचित राहिली आहे. म्हणूनच आता होणारी वसुली ही दरवाढ नसून पूर्वी महानिर्मितीस मंजूर झालेल्या परंतु, ग्राहकांकडून वसूल न झालेल्या खर्चाची महावितरणमार्फत होणारी प्रतिपूर्ती आहे.

---

दिनांक : ०७/०९/२०१३.

प्रति,
**माननीय संपादक,**
दैनिक

आदरणीय महोदय,

कृपया सदर बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या सर्व आवृत्तीत / वाहिनीवर प्रसिध्द करावी, ही नम्र विनंती.

धन्यवादासह,

आपला स्नेहांकित,

**जनसंपर्क अधिकारी**